**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलंम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उमेश गुलाबराव आगरकर
मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उमेश गुलावबराव आगरकर
मु.पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे श्री.बी.पी.वणवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.८.२००८ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

चाकण, ता.खेड, जि.पुणे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबतची माहिती दिली जात नाही व पंचायत समितीच्या ठरावाची अंमलबजावणी केली जात नाही. सरकारी गायरानात बांधलेल्या घरकुलाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.उमेश गुलाबराव आगरकर यांनी केली. श्री.आगरकर यांनी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांमार्फत समक्ष माहिती पाठविली होती. त्यांनी ती घेतली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे श्री.बी.पी.वणवे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

देऊ केलेली माहिती नाकारण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, तसेच मूळ अर्जात त्यांनी अनेक बाबींचे खुलासे विचारले असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासे, स्पष्टीकरण मागता येत नाही. द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे यांनी अपीलकर्त्यास त्वरित द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु जन माहिती अधिकारी श्री.पी.बी.वणवे यांनी या आदेशानुसार कार्यवाही न करता अपुरी व चुकीची माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आगरकर यांनी दि.८.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. आयोगाच्या आदेशानुसार केलेली कार्यवाही व माहितीची सत्यता याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड यांनी शहानिशा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चाकण, ता.खेड, जि.पुणे श्री.बी.पी.वणवे यांनी केलेली कार्यवाही व दिलेल्या माहितीची सत्यता यांची शहानिशा करून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड यांनी दि.१५.१२.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णा जयरामराव सुर्वे
डी-५/१७०, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त,
मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे -१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा जयरामराव सुर्वे
डी-५/१७०, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे -१ श्री.एस.आर.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपली वेतननिश्चिती चुकीची केली. त्याबद्दल तक्रारी केल्यानंतर सुधारित वेतन निश्चितीही पुन्हा चुकीची केली. दरम्यानच्या काळात आपण अकाऊंटंट जनरल यांच्याकडे अर्ज केल्यानंतर वेतननिश्चिती झाली. यात १२ वर्षाचा कालावधी गेला व आपले आर्थिक नुकसान झाले याला जबाबदार कोण व त्यांच्यावर काय कारवाई करणार याची माहिती दिली जात नाही, तसेच सुधारित निवृत्तीवेतनावर व अंशराशीकरणावर १६ टक्के व्याज मिळावे अशी मागणी अपीलकर्ता श्री.कृष्णा जयरामराव सुर्वे (सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक) यांनी केली.

श्री.सुर्वे यांना त्यांच्या तक्रारीबाबतची पूर्ण माहिती देण्यात आली आहे. वेतननिश्चिती चूक व रकमावरील व्याजाची मागणी याबाबतही त्यांना कळविण्यात आले असून ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची आहे. चुकीच्या वेतननिश्चिती अनुषंगाने कारवाईबाबतच्या त्यांच्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची माहिती आजच पत्रान्वये देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री.एस.आर.चौगले यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांनी सुनावणीत केलेल्या निवेदनानुसार अपीलकर्ता श्री.कृष्णा जयरामराव सुर्वे (सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक) यांच्या वेतननिश्चितीतील चूक व विलंब याबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतचे सुस्पष्ट पत्र श्री.सुर्वे यांना दिल्याबाबतचा अहवाल दि.२०.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक रंगनाथ गोसावी
अमि-बी-७, विलोज कू-ऑ.हौसिंग सोसायटी लि.,
पाईपलाईन रोड, बाळकुंभ, जि.ठाणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.विनायक रंगनाथ गोसावी<br>अमि-बी-७, विलोज कू-ऑ.हौसिंग सोसायटी लि.,<br>पाईपलाईन रोड, बाळकुंभ, जि.ठाणे<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,<br>ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,<br>ता.फलटण, जि.सातारा श्री.संभाजी हेरवाडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.९.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १७५२ ते १९६३ या काळातील वंशावळी प्रमाणे वतनाच्या सनदाच्या नकला जाणीवपूर्वक गहाळ करण्यात आल्या आहेत. कनिष्ठधारक व वरिष्ठधारक असल्यामुळे सनदपत्रक असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विनायक रंगनाथ गोसावी यांनी केले.

श्री.गोसावी यांनी मागणी केलेल्या सन १९२० चे इनामपत्रक आदी उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या. सनदा आपल्या कार्यालयात, तसेच फोटो-झिंको, नाईकनिंबाळकर देवस्थान ट्रस्ट, पुरालेखागार कार्यालय आदींकडेही शोध घेऊनही आढळलेल्या नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.संभाजी हेरवाडे यांनी केले. संबंधित व्यक्तिशी संपर्क साधून नोंदविलेल्या बदलाबाबतची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे यांनी केले.

वरील बाबी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे — अपीलकर्ता
अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, शिक्षण विभाग,
पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, शिक्षण विभाग,
पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्रीमती इंदिरा विठ्ठल कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,

पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्री.प्रसाद प्रभाकर कलगावकर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १४.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | २३.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | १०.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | (दि.२४.३.२००९ रोजी सुनावणी झाली.. आदेश नाही) |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| --- | --- |
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी प्राथमिक शिक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. परंतु श्री.जगदाळे यांनी माहिती मागितली तेव्हा असलेल्या परिस्थितीनुसार बदल्यांसाठी अर्ज प्राप्त झालेले नसल्याचे विहित मुदतीत त्यांना कळविले. सन १९९० पासूनची माहिती त्यांनी मागितली होती. काही माहिती दिल्यानंतर त्यांनी नव्या मुद्दयांचा समावेश करून अर्ज दिला. परंतु पूर्वीची माहिती क वर्गातील माहिती असल्यामुळे नष्ट करण्यात आली आहे, प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांच्या अनुषंगाने सन २००६ पासून श्री.जगदाळे सातत्याने अर्ज करीत असतात. विशिष्ट ठिकाणी बदली करण्याची त्यांची मागणी होती, त्यानुसार बदली न केल्यामुळे अशा प्रकारे वारंवार अर्ज व तक्रारी करून ते त्रास देत असतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.प्रसाद प्रभाकर कलगावकर यांनी केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे अपीलकर्ता
अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, शिक्षण विभाग,
पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, शिक्षण विभाग,
पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्रीमती इंदिरा विठ्ठल कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,

पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्री.प्रसाद प्रभाकर कलगावकर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १४.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | २३.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | १०.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | (दि.२४.३.२००९ रोजी सुनावणी झाली.. आदेश नाही) |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी प्राथमिक शिक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. परंतु श्री.जगदाळे यांनी माहिती मागितली तेव्हा असलेल्या परिस्थितीनुसार बदल्यांसाठी अर्ज प्राप्त झालेले नसल्याचे विहित मुदतीत त्यांना कळविले. सन १९९० पासूनची माहिती त्यांनी मागितली होती. काही माहिती दिल्यानंतर त्यांनी नव्या मुद्दयांचा समावेश करून अर्ज दिला. परंतु पूर्वीची माहिती क वर्गातील माहिती असल्यामुळे नष्ट करण्यात आली आहे, प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांच्या अनुषंगाने सन २००६ पासून श्री.जगदाळे सातत्याने अर्ज करीत असतात. विशिष्ट ठिकाणी बदली करण्याची त्यांची मागणी होती, त्यानुसार बदली न केल्यामुळे अशा प्रकारे वारंवार अर्ज व तक्रारी करून ते त्रास देत असतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.प्रसाद प्रभाकर कलगावकर यांनी केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे
दि.१६.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. दिलीप सिताराम देशपांडे — अपीलकर्ता
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, — उत्तरवादी
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे<br>मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | **अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,<br>पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | कार्यकारी अभियंता,<br>नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला योग्य माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

श्री. देशपांडे यांनी मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्याकडे न करता उपविभागीय अधिकारी, पंढरपूर पाटबंधारे उपविभाग, पंढरपूर यांच्याकडे केला होता. ते सहाय्यक जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी मूळ अर्ज व मुद्दे-निहाय खुलासा आपल्या कार्यालयास सादर केला. दरम्यानच्या काळात श्री. देशपांडे यांनी कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्याकडे अपील केले. त्यावर त्यांना त्वरित उत्तर देण्यात आले, परंतु त्यांनी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. तेथील सुनावणीस श्री. देशपांडे उपस्थित राहिले नाहीत. मात्र अर्जातील मुद्दयांबाबत व दिलेल्या माहिती-बाबत हजर राहण्यास त्यांना कळवून त्यांचेशी चर्चा करून आवश्यक ती जादा माहिती देण्याचे मान्य केले होते, त्यानुसार माहिती देण्यात आली. श्री. देशपांडे यांनी अर्जात काही विधाने केली असून त्याबाबतचे प्रश्न विचारले आहेत. तरीही त्याबाबत उत्तर दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा, फलटण श्री.दि.आ.पांढरे यांनी लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले. श्री. देशपांडे यांनी अन्य अर्जाद्वारे याच विषयाची माहिती पूर्वी मागितली होती, ती त्यांना देण्यात आली होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. दिलीप सिताराम देशपांडे — अपीलकर्ता
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, — उत्तरवादी
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे<br>मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | **अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,<br>पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | कार्यकारी अभियंता,<br>नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला योग्य माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

श्री. देशपांडे यांनी मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्याकडे न करता उपविभागीय अधिकारी, पंढरपूर पाटबंधारे उपविभाग, पंढरपूर यांच्याकडे केला होता. ते सहाय्यक जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी मूळ अर्ज व मुद्दे-निहाय खुलासा आपल्या कार्यालयास सादर केला. दरम्यानच्या काळात श्री. देशपांडे यांनी कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्याकडे अपील केले. त्यावर त्यांना त्वरित उत्तर देण्यात आले, परंतु त्यांनी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. तेथील सुनावणीस श्री. देशपांडे उपस्थित राहिले नाहीत. मात्र अर्जातील मुद्दयांबाबत व दिलेल्या माहिती-बाबत हजर राहण्यास त्यांना कळवून त्यांचेशी चर्चा करून आवश्यक ती जादा माहिती देण्याचे मान्य केले होते, त्यानुसार माहिती देण्यात आली. श्री. देशपांडे यांनी अर्जात काही विधाने केली असून त्याबाबतचे प्रश्न विचारले आहेत. तरीही त्याबाबत उत्तर दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा, फलटण श्री.दि.आ.पांढरे यांनी लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले. श्री. देशपांडे यांनी अन्य अर्जाद्वारे याच विषयाची माहिती पूर्वी मागितली होती, ती त्यांना देण्यात आली होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३० .११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जाकीर हुसेन इनामदार — अपीलकर्ता
१२-ब, डॉ. बापूजी साळुंखे नगर,
शिवराज पेट्रोल पंपाजवळ, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पुसेगाव, ता.खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जाकीरहुसेन इनामदार
१२-ब, डॉ. बापूजी साळुंखे नगर,
शिवराज पेट्रोल पंपाजवळ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि. सातारा श्री. बी.व्ही.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पुसेगाव, ता.खटाव, जि. सातारा श्री. एस.एस.पवार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.११.२००८, १८.१२.२००८ व १.२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन २००१ ते २००८ या काळात पुसेगाव ग्रामपंचायतीने केलेल्या खर्चाच्या व विकास कामांच्या आराखड्याची माहिती प्रसार माध्यमांसमोर पंचनामा करून सिलबंद व प्रमाणित करून देण्याची मागणी अपीलकर्ता श्री. इनामदार जाकीर हुसेन यांनी केली होती. माहिती घेण्याबाबत त्यांना चार वेळा तारखा देण्यात आल्या. एकाही तारखेला ते आले नाहीत. वेळेवर हजर न राहता आपण येऊन गेल्याचे नमूद करून, माहिती न मिळाल्याची तक्रार ते करतात, अशी त्यांची कार्यपध्दती आहे, असे प्रदिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पुसेगाव श्री. एस.एस. पवार यांनी केले. अपिलाच्या सुनावणीच्या तारखांना श्री. इनामदार उपस्थित राहत नाहीत. दूरध्वनीवर प्रत्यक्ष बोलून दिलेल्या तारखांनाही ते हजर राहत नाहीत. माहिती मागून अन्य स्वरूपाच्या व्यक्तिगत मागण्या ते करतात, असा आणखी ग्रामपंचायतींचाही अनुभव आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव श्री. बी.व्ही.पवार यांनी केले.

'पुसेगाव ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबतचा तक्रारीचा अर्ज काही लोकांनी आमचे संस्थेकडे दाखल केला होता. परंतु सदर तक्रारदारांनी सदरच्या तक्रारीचा पाठपुरावा करण्यास आणि आवश्यक ती मदत करण्यास नकार दर्शविला असल्यामुळे मला आमचे संस्थेस, सद्य परिस्थितीत आपले ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणी / पहाणेची आवश्यकता वाटत नाही,' असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. इनामदार यांनी आयोगाला सादर केले.

वस्तुतः तक्रारदारांनी तक्रारीचा पाठपुरावा न करण्याचा व अपीलकर्त्याने माहिती न स्वीकारण्याचा काहीही संबंध नाही. तसेच प्रसार माध्यमांपुढे पंचनामा करून माहिती द्यावी, अशा प्रकारे माहिती मागण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. या स्वरूपात माहिती मागणे व नंतर त्याबाबत माहितीची आवश्यकता नसल्याची भूमिका घेणे हा प्रकार अपीलकर्त्याच्या विश्वासार्हतेबद्दल संशय निर्माण करणारा आहे, तसेच सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती याचा अपव्यय करणारा आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुरेश नारायण रेगे
मोहन प्रिंटरी, १०५, १०६, व १०७ उद्योग मंदिर नं.१,
७-सी, भागोजी कीर मार्ग, माहिम, मुंबई-४०० ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
(नागरी बँका ) महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०३ + २२९० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तर्फे प्रतिनिधी एस.जी. वाघ, मुख्य लिपिक

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
(नागरी बँका ) महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. प्रकाश अष्टेकर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २८०३/पुणे | २३.६.२००८ | ३०.७.२००८ | ११.८.२००८ | २४.१०.२००८ |
| २२९०/पुणे | २८.१२.२००७ | ११.२.२००८ | -- | ६.६.२००८ |

माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.२२९० /पुणे चा समावेश होता. सदर कार्यक्रमास सर्व संबंधित उपस्थित होते. तसेच दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.२८०३/पुणे चा समावेश असून सदर कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे अपिलांची दि. १९.६.२००९ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसही अपीलकर्ता श्री. रेगे उपस्थित नव्हते.

सारस्वत को.ऑप. बँक लि., मुंबई विरूध्द आपण केलेल्या तक्रार अर्जाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समाधानकारक दिली नाही, तसेच सारस्वत को.ऑप.बँकेने रिझर्व्ह बँकेच्या घोषनेनुसार एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत दिलेल्या सवलतींबाबतची माहिती मिळाली नाही. आपल्याला योजना लागू नसल्याचे कारण देऊन आपण केलेला अर्ज बँकेने विचारात घेतला नाही, असे अपीलकर्ता श्री. सुरेश नारायण रेगे यांनी अपील अर्जात प्रतिपादन केले आहे.

श्री. रेगे यांचा सारस्वत को.ऑप. बँक लि., मुंबई विरुध्द वसुलीबाबत तक्रार करणारा अर्ज नागरी बँक शाखेला दि. १४.६.२००७ रोजी प्राप्त झाला. पुढील कार्यवाही करण्यासाठी तो मूळ पत्रासह दि. २१.६.२००७ च्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला व तसे श्री. रेगे यांना कळविण्यात आले. माहितीच्या अधिकारात त्यांनी अर्ज केल्यानंतर कार्यवाहीबाबतची माहिती त्यांना देण्यात आली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी या प्रकरणी कार्यवाही करुन दोन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा, असा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील प्रशासकीय स्वरुपाचा निर्णय श्री. रेगे यांच्या प्रथम अपिलावर आपण दिला. (अपील क्र. २८०३/पुणे ). सारस्वत को.ऑप. बँक लि., मुंबई ही बँक मल्टीस्टेट को.ऑप बँक असून केंद्रिय निबंधक, नवी दिल्ली यांच्या अधिकार कक्षेत येते. त्यामुळे या बँकेकडील एकरकमी कर्ज परतफेड योजनेबाबतची माहिती आपल्या कार्यालयाकडे नाही. तसे श्री. रेगे यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त, व विशेष निबंधक, सहकारी संस्था, (नागरी बँका) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी लेखी निवेदनाद्वारे नमूद केले (अपील क्र.२२९०/पुणे). जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री. प्रकाश अष्टेकर यांनी त्याचा पुनरुच्चार केला. त्यांचे निवेदन रास्त आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांनी दोन महिन्यात कार्यवाही करुन अपीलकर्त्यास उत्तर द्यावे, या दि.२४.१०.२००८ च्या आदेशानुसार केलेल्या पुढील कार्यवाहीबाबतची माहिति अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. 'जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दोन महिन्यात कार्यवाही करुन अपीलकर्त्यास उत्तर द्यावे,' या अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.२४.१०.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या पुढील कार्यवाहीबाबतचा अहवाल अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. २५.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्याला पाठवावी.

**दि. १२.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल
११४, स्टेशन रोड, गल्ली नं.५, पोस्ट बॉक्स नं.७१,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८ .१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल
११४, स्टेशन रोड, गल्ली नं.५, पोस्ट बॉक्स नं.७१,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सचिव, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,<br>जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.ए.चौगुले | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.१००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल यांनी एकाच विषयाबाबत जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर, ता.जयसिंगपूर, जि.कोल्हापूर या संस्थेकडे सन २००४ पासून सातत्याने अर्ज केले असून माहितीच्या अधिकारातही अनेक अर्ज व अपिले केली आहेत. त्यांच्या किमान २३ अर्जांवर वेळोवेळी त्यांनी संपूर्ण माहिती देण्यात आली. माहितीपेक्षा आपल्या मागणीनुसार प्रशासकीय कार्यवाही व्हावी अशा मागणीसाठी माहितीच्या अधिकाराचा ते गैरवापर करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर, ता.जयसिंगपूर, जि.कोल्हापूर श्री.एस.ए.चौगुले यांनी केले. जन माहिती

अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माहिती दिली असून ती योग्य आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने रास्त आहेत. यापूर्वी श्री.रूणवाल यांच्या याच संदर्भातील अपील क्र.८६+२९०+४७७ या अपिलांचा निर्णय आयोगाने दिला आहे. त्याच कारणासाठी पुन:पुन्हा अशा स्वरूपाचे अर्ज व अपिले करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य उपयोग नाही, तसेच सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती यांचा अपव्यय करणारी ही कृती आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल
११४, स्टेशन रोड, गल्ली नं.५, पोस्ट बॉक्स नं.७१,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८ .१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल
११४, स्टेशन रोड, गल्ली नं.५, पोस्ट बॉक्स नं.७१,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.ए.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.१००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.कांतीलाल मिलापचंद रूणवाल यांनी एकाच विषयाबाबत जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर, ता.जयसिंगपूर, जि.कोल्हापूर या संस्थेकडे सन २००४ पासून सातत्याने अर्ज केले असून माहितीच्या अधिकारातही अनेक अर्ज व अपिले केली आहेत. त्यांच्या किमान २३ अर्जांवर वेळोवेळी त्यांनी संपूर्ण माहिती देण्यात आली. माहितीपेक्षा आपल्या मागणीनुसार प्रशासकीय कार्यवाही व्हावी अशा मागणीसाठी माहितीच्या अधिकाराचा ते गैरवापर करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर, ता.जयसिंगपूर, जि.कोल्हापूर श्री.एस.ए.चौगुले यांनी केले. जन माहिती

अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माहिती दिली असून ती योग्य आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने रास्त आहेत. यापूर्वी श्री.रूणवाल यांच्या याच संदर्भातील अपील क्र.८६+२९०+४७७ या अपिलांचा निर्णय आयोगाने दिला आहे. त्याच कारणासाठी पुनःपुन्हा अशा स्वरूपाचे अर्ज व अपिले करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य उपयोग नाही, तसेच सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती यांचा अपव्यय करणारी ही कृती आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड.विशाल शिंदे
१०५०, नवी नाना पेठ, भारत टॉकीज जवळ, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६ उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.विशाल शिंदे
१०५०, नवी नाना पेठ, भारत टॉकीज जवळ, पुणे ४११ ००२

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६ डॉ.संजय कोलते
**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे -१६ प्रतिनिधी श्री.प्रशांत शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०४.०६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.०१.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पुण्यातील नवीन नाना पेठ येथील एका बांधकामाबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र व बांधकाम नियंत्रण व विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अनेक अर्ज करूनही योग्य माहिती दिली जात नाही. प्राधिकरण व महापालिकेचा बांधकाम नियंत्रण विभाग हे माहिती देण्याची जबाबदारी परस्परांवर ढकलत राहून अर्जदाराला योग्य माहिती देत नाहीत. संबंधित बांधकामातील काही सदनिकांमधील सदस्यांची माहिती देण्यात आली. गलिच्छ वस्ती निर्मूलन, बांधकाम नियंत्रण विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अशा वेगवेगळ्या विभागांकडे अर्ज करावे लागले. तरीही एक, दोन, तीन, व चार या इमारतींमधील सदनिकांबाबतची माहिती दिली जात नाही. ए विभागामध्ये सातव्या मजल्यापर्यंत लिफ्ट आहे, परंतु इमारत आठ मजल्यांची आहे. माहिती दडविण्याचे कारण उघड व्हावे, तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नियमावलीनुसार सदनिकांचे वाटप व त्यांच्या फेरविक्रीबाबतच्या बंधनांचे पालन झाले आहे काय, विकसक स्वतःच नियमभंग करून सदनिका खरेदी करू शकतो काय, असे अनेक प्रश्न या विषयात गुंतलेले आहेत. शासकीय योजनेच्या कायदेशीर अंमलबजावणीचा हा विषय असल्यामुळे पूर्ण माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड.विशाल शिंदे यांनी केली.

विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला पुणे महानगरपालिकेने मंजुरी दिलेली आहे. योजनेतील इमारतींच्या बांधकामाला पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण विभागाने

परवानगी दिलेली आहे. बांधकामाचे नियंत्रण, झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप इत्यादी सर्व प्रक्रिया महानगरपालिकेच्या बाधकाम नियंत्रण व गलिच्छ वस्ती निर्मूलन विभागाकडून करण्यात आलेली आहे. याबाबतची माहिती ॲड.शिंदे यांना देण्यात आली असून माहिती देण्याबाबत बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभागाला कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांचे प्रतिनिधी श्री.प्रशांत शिंदे यांनी प्रतिपादन केले. दोन टप्प्यांमध्ये माहिती दिली. पुणे महानगरपालिकेकडून माहिती घ्यावी असे ॲड.शिंदे यांना कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र डॉ.संजय कोलते यांनी सांगितले.

अपीलकर्त्याने काही बाबींचा खुलासा व अभिप्राय मागितला आहे, अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येत नाही. मात्र अन्य मुद्दयांबाबतची परिपूर्ण माहिती अपीलकर्त्याला मिळालेली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका व गलिच्छ वस्ती निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याशी संबंधित अशी ही माहिती असून ॲड.शिंदे यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक विभागाने काही माहिती देऊन ऊर्वरित माहितीची जबाबदारी अन्य विभागांवर टाकली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे स्वरूप लक्षात घेता अचूक माहिती दिली जाणे सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेसाठी महत्त्वाचे व आवश्यक आहे. मात्र अपीलकर्ता ॲड.विशाल शिंदे यांनी भाष्य, खुलासे यांची मागणी न करता नेमकी 'माहिती' मागितली पाहिजे. मूळ अर्जानुसार माहितीच्या मागणीचे नेमके मुद्दे नमूद करणारे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड क्षेत्र यांना ॲड.शिंदे यांनी सादर करावे, त्यानुसार स्वत:कडील माहिती प्राधिकरणाने द्यावी व पुणे महानगरपालिकेकडील बांधकाम नियंत्रण व विकास योजना, नगर अभियंता कार्यालय व गलिच्छ वस्ती निर्मूलन विभाग यांना अर्जाची प्रत पाठवून त्यांच्याकडील माहिती देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन

प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांनी कळवावे. या विभागांनी आपल्याकडील माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, नगर अभियंता कार्यालय व गलिच्छ वस्ती निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी कार्यवाही करून दि.१५.११.२००९ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ४ .११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र राऊ आयरे
डी, वॉर्ड, घर नं.२६०८, डांगे गल्ली, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, उत्तरदायी
पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र राऊ आयरे
डी, वॉर्ड, घर नं.२६०८, डांगे गल्ली, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे श्री.उमाकांत कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर श्री.जे.एन.खवले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

भोई समाज को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील बनावट सभासदांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला दिलेली माहिती खोटी आहे. बनावट सभासदांची चौकशी करण्याचे आदेश विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर यांना वरिष्ठांनी दिले होते. परंतु त्यांनी चौकशी केली नाही व खरी यादी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र राऊ आयरे यानी केली.

श्री.आयरे यांनी या संस्थे संदर्भात वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. बनावट सभासदांच्या माहितीची मागणी मूळ पत्रानंतर एक वर्षाने त्यांनी केली. या संदर्भातील चौकशी चालू असल्याची माहितीही त्यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.जे.एन.खवले यांनी केले.

बनावट सभासदांची चौकशी करण्याची मागणी प्रशासकीय स्वरूपाची असली तरी त्याबाबतची नेमकी माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. संबंधित चौकशी १५ दिवसांत पूर्ण करून अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२३.१२.२००८ रोजी चौकशी करून दि.२९.१२.२००८ च्या पत्रान्वये

श्री.आयरे यांना संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर श्री.जे.एन.खवले यांनी दि.३१.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१६.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र राऊ आयरे
डी, वॉर्ड, घर नं.२६०८, डांगे गल्ली, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, उत्तरदायी
पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र राऊ आयरे
डी, वॉर्ड, घर नं.२६०८, डांगे गल्ली, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे श्री.उमाकांत कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर श्री.जे.एन.खवले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

भोई समाज को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील बनावट सभासदांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला दिलेली माहिती खोटी आहे. बनावट सभासदांची चौकशी करण्याचे आदेश विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर यांना वरिष्ठांनी दिले होते. परंतु त्यांनी चौकशी केली नाही व खरी यादी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र राऊ आयरे यानी केली.

श्री.आयरे यांनी या संस्थे संदर्भात वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. बनावट सभासदांच्या माहितीची मागणी मूळ पत्रानंतर एक वर्षाने त्यांनी केली. या संदर्भातील चौकशी चालू असल्याची माहितीही त्यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.जे.एन.खवले यांनी केले.

बनावट सभासदांची चौकशी करण्याची मागणी प्रशासकीय स्वरूपाची असली तरी त्याबाबतची नेमकी माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. संबंधित चौकशी १५ दिवसांत पूर्ण करून अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२३.१२.२००८ रोजी चौकशी करून दि.२९.१२.२००८ च्या पत्रान्वये

श्री.आयरे यांना संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर श्री.जे.एन.खवले यांनी दि.३१.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१६.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.धनाजी आनंदा पाटील
मु.पो.का|| बोरगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी,
लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
भारत हायस्कूल वसाहत, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धनाजी आनंदा पाटील
मु.पो.का|| बोरगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी,
लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर श्री.बबन संतू अर्दाळकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, भारत हायस्कूल वसाहत, कोल्हापूर
सौ.शन्मुखा बबन अर्दाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर या संस्थेच्या प्रबुध्द भारत हायस्कूलमध्ये आपण सेवेत कार्यरत होतो. न्यायालयाचे निर्णय आपल्या बाजूने होऊनही व शाळेला सन १९९७-९८ पासून अनुदान मिळत असूनही कामावरून कमी केले, पगारपत्रके तयार करून दिली असतानाही सही करून पाठविली जात नाहीत व संस्था जाणीवपूर्वक माहिती देत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.धनाजी आनंदा पाटील यांनी केली.

आपली संस्था सामाजिक प्रेरणेतून सन १९९१ साली सुरू केली. अपीलकर्ता श्री.पाटील व त्यांचे सहकारी संस्थेला त्रास देत आहेत. शैक्षणिक काम न करता संस्थेविरूध्द जातीयवादी कारवाया करून व्यवस्थापनाशी असहकाराचे वर्तन करीत आहेत, तसेच संस्थेकडे आर्थिक मागण्या करीत आहेत. या संदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांकडे आपण दाद मागितली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी सौ.शन्मुखा बबन अर्दाळकर व अपिलीय प्राधिकारी श्री.बबन संतू अर्दाळकर यांनी केले.

संस्थेअंतर्गत वादातून उभय बाजू परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. त्या अनुषंगाने विविध न्यायासनांपुढे परस्परांविरूध्द चालू असलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने माहितीच्या अधिकाराचा

वापर उभय बाजू करीत आहेत. अपीलकर्त्याच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाही संदर्भातील असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यांनी अ.क्र.१८२/९८ व ३२/२९० मध्ये दिलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. ही माहिती नि:शुल्क देणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१६.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ